CMYK

बीड । सोमवार
१४.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : १०४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# २९ ऑगस्टला आंतरवाली सोडली तर मागे सरकणार नाही
# मनोज जरांगे पाटील यांचा इशारा



**• तर सळो की पळो करतो**

**यांनी मराठ्यांना आरक्षण दिलं नाही तर यांना सळो की पळो करतो असे सांगून ते पुढे म्हणाले की ज्या दिवशी आंतरवालीत राज्यव्यापी बैठक झाली, त्या दिवशी जागा सुद्धा पुरली नाही. आता मुंबईत लोक कसे येतील हे फक्त फडणवीस साहेबांनी बघावं. २९ ऑगस्टच्या आत तुम्ही आरक्षण देऊन टाका अन्यथा परिस्थिती हाता बाहेर जाईल त्यास जबाबदार तुम्ही राहाल असा इशाराही जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे.**

**• मराठा विद्यार्थ्यांच्या व्हॅलिडीटी थांबलेल्या**

**संजय शिरसाठ यांना सुद्धा माझं सांगणं आहे की राज्यभरातल्या मराठा विद्यार्थ्यांच्या व्हॅलिडीटी थांबलेल्या आहेत, त्यामुळे विनाकारण तुम्ही मराठा समाजाचा रोष अंगावर ओढून घेऊ नका. तुमच्या मंत्रालयाकडून माझ्या मुलांचे प्रवेश रद्द व्हायला लागले आहेत. हे काम शिरसाट साहेब तुमच्याकडून होऊ देऊ नका. अजून वेळ गेलेली नाही जर का तुमच्या विरोधात सर्व गेले तर कोणी वाचवणार नाही.**

**• शिरसाठ यांचा मराठ्यांशी डबल गेम ?**

**संजय शिरसाट यांना मी या संदर्भात तीन वेळेस सांगितलं आणि त्यांनी देखील माझ्यासमोर तीनदा फोन केले होते परंतु काही अधिकाऱ्यांचं म्हणणं असं आहे की, ते तेवढ्यापुरतंच द्या म्हणतात आणि नंतर नाही म्हणतात. त्यामुळे संजय शिरसाठ हे मराठ्यांशी डबल गेम खेळतील असा मला वाटलं नव्हतं. या संपूर्ण प्रकरणात मला ते जबाबदार वाटत होते मात्र, तुम्ही प्रधान सचिवांना सूचना देऊन देखीलही जर आदेश निघत नसतील तर ते योग्य नाहीत असेही ते म्हणाले.**

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे यांनी पुन्हा आरक्षणासाठी २३ ऑगस्ट रोजी मुंबईत पोहचण्याचा इशारा दिला आहे. गेल्या पंधरा दिवसात नोंदी सापडलेल्या आहेत. त्यांना कुणबी प्रमाणपत्र जाणून बुजून भरुन दिले जात नसल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. सरकार आमचे ऐकत नसेल तर पहिल्या पेक्षा पाच पट जास्त लोक मुंबईला जातील असाही इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

मनोज जरांगे यांनी काँग्रेसच्या नेत्या प्रणिती शिंदे यांची भेट घेतली आहे. या संदर्भात विचारले असता ते म्हणाले की सर्व पक्षातील आमदार खासदार आणि मंत्री महोदयांना आम्ही स्वतःहून फोन केले होते.आमचं गोरगरीब मराठ्यांच्या आरक्षणाचा प्रश्न तुमच्यापाशी मांडायचा आहे. त्यांच्याकडे आमचं गाऱ्हान सांगणं आमचं काम आहे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तुम्ही जाऊन सांगा की मराठी आणि कुणबी एकच आहेत तो जीआर काढा असेही जरांगे यांनी म्हटले आहे.

मागच्या पंधरा दिवसात नोंदी सापडलेले आहेत, त्यांना कुणबी प्रमाणपत्र जाणून बुजून दिल्या जात नसल्याचे जरांगे पाटील यांनी यावेळी सांगितले.हे सगळे जर ऐकत नसतील तर पहिल्यापेक्षा २९ ऑगस्टला पाच पट जास्त लोक मुंबईला जातील असा दावाही मराठा आंदोलक जरांगे पाटील यांनी केला.आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील फोन करून सांगितलेले आहे की तुमच्याकडे गोरगरीब मराठ्यांच्या आरक्षणाचा मुद्दा तुमच्याकडे मांडायचा आहे. एकदा जर मी २९ ऑगस्टला आंतरवाली सोडली तर मागे सरकणार नाही असाही इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे.

ज्याला आपण निवडून पुढे पाठवले. तोच आपल्या आरक्षणाबद्दल बोलत नाही. आता म्हणून आम्हीच आता मरु पण विजयच घेऊन येऊ, तसा मोकळ्या हाताने माघारी येणार नाही असा निर्धार जरांगे पाटील यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे. मराठ्यांना मी आता एकच आव्हान करतो की मतभेद आणि मनभेद असतील तर ते सोडून द्या, गोरगरीब मराठ्यांच्या लेकरासाठी फक्त दोनच दिवस मुंबईला या असे आवाहनही मराठ्यांना जरांगे पाटील यांनी केले आहे.

## जेथे देशाच्या सिमेचे रक्षण करणारांचेच आई - वडिल सुरक्षीत नाहीत ; तेथे इतरांच्या सुरक्षेचे काय ?

**पाकिस्तान बॉर्डर नजीक देशसेवा करणाऱ्या लाडे वडगाव येथील सैनिकाचा संतप्त सवाल**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मी देशाच्या सिमेचे रक्षण करीत आहे. मात्र माझ्या गावी चोरांपासून आई-वडिलांना खूप मोठा धोका आहे. काही दिवसांपूर्वी लाडे वडगाव शिवारामध्ये माझ्या शेतात आई-वडील पेरणीची तयारी करीत असताना रात्रीला बेदम मारहाण करून, जबरी चोरी करून आईचे कान कापले. आणि चोरांनी सोन्याचे दागिने लंपास केले आहेत. त्यामुळे जेथे देशाच्या सिमेचे रक्षण करणाऱ्या आमच्या सारख्या सैनिकांचे

**● एखाद्या देश सेवा करणाऱ्या व्यक्तीच्या आई-वडिलांचा चोरांपासून छळ होतो. तर सर्व सामान्य जनतेचे काय हाल होत असतील. याची कल्पनाच न केलेली बरी. हे वेळीच थांबले नाही तर आज ना उद्या अशा चोरांपासून जीवितहानी होणार हे मात्र नक्की. - सुग्रीव लाड (आजी सैनिक)**

आई - वडिलच सुरक्षीत नाहीत, तेथे इतरांच्या सुरक्षेचे काय..? असा संतप्त सवाल पाकिस्तान बॉर्डरपासून अवघ्या दहा किलोमीटर अंतरावर देशसेवा करणाऱ्या लाडे वडगाव येथील सैनिक सुग्रीव लाड यांनी विचारला आहे.

काही दिवसांपूर्वी लाडे वडगाव शिवारामध्ये चोरांनी मोठा धुमाकूळ घातला. यात देश सेवेसाठी पाकिस्तान बॉर्डरवर सेवा बजावत असलेल्या सैनिक सुग्रीव लाड यांना रात्री तीन वाजता फोन करून सांगण्यात आले की, मारहाण करून व तुमच्या आईचे कान ▶▶ उर्वरित पान २ वर

## संभाजी ब्रिगेडच्या प्रवीण गायकवाडांना काळं फासलं

**अक्कलकोट । प्रतिनिधी**

अक्कलकोटमधून मोठी बातमी समोर येत आहे. येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना काळं फासण्यात आलं आहे. प्रवीण गायकवाड हे अक्कलकोट येथे फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाच्या कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी ही घटना घडली. शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळं फासलं असल्याचं बोललं जातंय.

नेमकं काय घडलं ?

मिळालेल्या माहितीनुसार प्रवीण गायकवाड हे अक्कलकोट दौऱ्यावर होते. यावेळी ते फत्तेसिंह



शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात आले होते. तिथे येताच काही लोक अचानकपणे त्यांच्याकडे आले आणि जमा होत त्यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

**● सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता, पण...**

**दरम्यान आज अक्कलकोट मध्ये प्रवीण गायकवाड यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्यांना काळं फासण्यात आलं. हे प्रकरण घडल्यानंतर अद्याप प्रवीण गायकवाड यांनी कोणताही प्रतिक्रिया दिलेली नाही. या प्रकरणावर गायकवाड नेमकी काय भूमिका घेणार ? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**

## लातूर हादरले! ७० वर्षांच्या सासूला सुनेकडून अमानूष मारहाण, शेतीच्या कामावरुन वाद



**लातूर । प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्यात एक धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. किरकोळ कारणावरुन सुनेने सासूला आमानुषपणे मारहाण केली आहे. ही सर्व घटना व्हिडिओत कैद झाली असून सोशल मीडियावर हा व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. तसंच, या सुनेविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

लातूर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सुमठाणा गावातील प्रकार असल्याची माहिती समोर येत आहे. शेतीच्या किरकोळ कामावरुन सासू आणि सुनेमध्ये वाद झाले होते. त्यानंतर सुनेने सासुला अमानुष मारहाण केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुनेने याआधीदेखील सासूला मारहाण केली होती. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर या सुनेवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

व्हायरल व्हिडिओत तुम्ही पाहू शकता, सून वृद्ध महिलेचे केस ओढत, तिला जमिनीवर फरफटत नेताना आणि लाथाबुक्क्यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

## तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात बीड तालुक्यात काँग्रेसच्या गाव तिथे शाखा अभियानास सुरुवात

**• येणाऱ्या सर्व निवडणुका काँग्रेस स्वबळावर लढणार - राहुल सोनवणे**
**• शेतकरी कष्टकऱ्याच्या न्यायहक्कासाठी काँग्रेस कटिबद्ध - गणेश बजगुडे पाटील**

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असताना काँग्रेस पक्ष स्वबळाचा नारा देत बीड तालुक्यात पक्ष संघटन मजबुत करण्यासाठी तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज बीड तालुक्यात मंजेरी हवेली, बाबामिया इनामदार नगर, तेलगाव रोड येथे ▶ उर्वरित पान २ वर



## जानकीच्या आनंदाला दिव्यांग, वृद्धांच्या आशिर्वादाची किनार

**पोखरकर परिवाराची बांधिलकी ; दिव्यांग, वृध्दांना दिले व्हिलचेअर**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील पोखरकर परिवाराकडून पुन्हा एकदा बांधिलकी जोपासत दिव्यांग, वृध्दांना दिले व्हिलचेअर देण्यात आले. जानकी राजेंद्र पोखरकर हिचे अभिष्टचिंतन करीत जानकीच्या आनंदाला लाभली दिव्यांग, वृद्धांच्या आशिर्वादाची किनार लाभली.

हल्लीच्या काळात वाढदिवस साजरा करताना विविध गोष्टींवर भरमसाठ खर्च केला जातो. मात्र, या गोष्टींपेक्षा सामाजिक जाणीव ठेवत, समाजासाठी काहीतरी



चांगले करून वाढदिवस साजरा करणे अधिक अर्थपूर्ण ठरते. येथील राजेंद्र पोखरकर यांनी त्यांची कन्या जानकी हिच्या ४ थ्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दिनांक ११ जुलै रोजी वयोवृद्ध, दिव्यांगांना व्हीलचेअर वाटप करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. समाजामध्ये अशा विविध समाज घटकांना आधार देण्याचं कामटायगरग्रुपमराठवाडाअध्यक्ष गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर यांच्या संकल्पनेतून आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. राजेंद्र पोखरकर यांनी आपली मुलगी जानकी हिचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याच्या प्रेरक कृतीचे सर्वस्तरांतून कौतुक करण्यात येत आहे. यावेळी पोलीस मित्र संघटनेचे पदाधिकारी, गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर, राजेंद्र भैय्या, दिपक लामतुरे, बालाजी रूद्राक्ष, कोंडीराम पवार, आदित्य देशमुख, दीपक पवार, स्वप्नील सोनवणे, तिरूपती राठोड व संपूर्ण पोखरकर कुटूंबिय, नातेवाईक आणि मित्र परिवार उपस्थित होता.







CMYK

# सामाजिक न्याय विभागाच्या शैक्षणिक सहाय्य योजना

वंचित घटकांतील नागरिकांना शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा या क्षेत्रात समान संधी आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग विविध उपक्रमांच्या माध्यमातून कार्यरत आहे. या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष सुरू झाल्याच्या पार्श्वभूमिवर या विभागाच्या शैक्षणिक योजनांची माहिती देणारा लेख...

सांगली जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, म्हणून सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या वतीने शासकीय वसतिगृह, शासकीय निवासी शाळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना व विविध शिष्यवृत्तीच्या योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

शासकीय वसतिगृह योजना :- या योजनेअंतर्गत सांगली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मुलांचे व मुलींचे प्रत्येकी एक शासकीय वसतिगृह अशी एकूण (21) वसतिगृहे शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यामध्ये 11 मुलांची व 10 मुलींची शासकीय वसतिगृहे आहेत.

या योजनेस पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रक्कम रूपये (जिल्हा स्तर-600 व तालुका स्तर-500) इतका निर्वाह भत्ता मिळतो व विद्यार्थिनींना यामध्ये वाढीव 100 रूपये भत्ता मिळतो. त्याचबरोबर मोफत निवास, भोजन तसेच स्टेशनरी, ॲपरन, प्रोजेक्ट रिपोर्ट, शैक्षणिक सहल खर्च, वार्षिक स्नेहसंमेलनाकरिता लागणारा खर्च विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येतो. सन 2024-25 या शैक्षणिक वर्षामध्ये जिल्ह्यातील 21 वसतिगृहात एकूण 1305 विद्यार्थी प्रवेशित असून सन 2025-26 करिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

शासकीय निवासी शाळा योजना :- या योजनेअंतर्गत इयत्ता 6 वी ते 10 वी पर्यंतचे शिक्षण व निवास मोफत देण्यात येत आहे. सांगली जिल्ह्यामध्ये तासगाव (कवठेएकंद), खानापूर, कवठेमहांकाळ व कडेगाव (वांगी) तालुक्यामध्ये मुलांसाठी चार तसेच जत व पलूस (बांबवडे) या दोन तालुक्यात मुलींकरिता शासकीय निवासी शाळा शासकीय इमारतीमध्ये कार्यरत आहेत. या सहा शासकीय निवासी शाळांची एकूण प्रवेश क्षमता 1200 (प्रती शाळा 200) असून सन 2024-25 मध्ये 586 विद्यार्थी प्रवेशित आहेत. व 2025-26 मधील प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

शासकीय निवासी शाळेतील प्रवेशितांना सर्व शैक्षणिक साहित्य, निवास व भोजन इत्यादि सोयीसुविधा मोफत पुरविण्यात येत आहे. येथे गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्यात येत असून 2024-25 मध्ये सर्व शाळांचा निकाल 100 टक्के लागला असून 1 विद्यार्थिनीने मागासवर्गीयांमध्ये राज्यात पहिला क्रमांक पटकविला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना : या योजनेअंतर्गत इयत्ता 11 वी व 12 वी तसेच 12 वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ज्या विद्यार्थांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळू शकला नाही, अशा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना दहा महिन्याकरिता भोजन, निवास व निर्वाह भत्ता याकरिता एकूण 43,000 इतकी रक्कम दोन टप्प्यांमध्ये त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येते. सन 2024-25 मध्ये जिल्ह्यामध्ये एकूण 142 इतक्या विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून सन 2025-26 करीता ऑनलाईन अर्ज भरून घेण्यात येत आहेत.

भारत सरकार शिष्यवृत्ती :- ज्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा कमी आहे व ज्यांचा प्रवेश शासकीय कोट्यातून प्रवेश निश्चित झाला आहे, अशा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो. यामध्ये शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता दिला जातो. सन 2024-25 करिता 8001 विद्यार्थ्यांनी याजनेचा लाभ घेतला असून अजूनही या योजनेतून लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

शिक्षण फी परीक्षा फी योजना :- ज्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त आहे, अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. यामध्ये शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क दिले जाते. सन 2024-25 करिता 732 विद्यार्थ्यांनी याजनेचा लाभ घेतला असून अजूनही या योजनेतून लाभ देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना :- ज्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना 10वी मध्ये 75 टक्के व त्यापेक्षा जास्त मार्क पडतात, त्यांना या योजनेचा लाभ मिळतो. या योजनेनुसार विद्यार्थ्यास 11 वी व 12 वी मध्ये प्रती वर्ष 5000 रूपये मिळतात. सन 2024-25 करिता 178 विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे.

निर्वाहभत्ता योजना :- जे अनुसूचित जातीचे विद्यार्थी संस्थेच्या वसतीगृहात अथवा वसतीगृहाबाहेर राहतात त्यांना ही योजना लागू आहे. यामध्ये वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना 13500/- व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना 7000 रूपये प्रती वर्ष मिळतात. सन 2024-25 करिता 228 विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे.

परराज्य शिष्यवृत्ती योजना :- ज्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा कमी आहे व ज्यांचा प्रवेश शासकीय कोट्यातून प्रवेश निश्चित झाला आहे अशा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो. यामध्ये शिक्षणशुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता दिला जातो. सन 2024-25 करिता 03 विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला असून अजूनही या योजनेतून लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना :- अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात नामांकित शिक्षण संस्थेत शिक्षणाची संधी मिळावी याकरिता ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्याला शिक्षण संस्थेचे शुल्क, आरोग्य विमा, व्हिसा शुल्क, वार्षिक निर्वाह भत्ता, विमानप्रवास, अकस्मात खर्च, पोस्ट स्टडी व्हिजा इत्यादी सवलती दिल्या जातात.

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचे जे विद्यार्थी पदव्युत्तर पदवी आणि डॉक्टरेट अभ्यासक्रमासाठी QSW रँकींग 200 च्या आत असणाऱ्या परदेश शिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेतील अशा एकूण 75 विद्यार्थ्यांची निवड या योजनेअंतर्गत करण्यात येते. सन 2025-26 करिता महाराष्ट्रातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी सांगली जिल्ह्यातील 03 विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

हे विभाग अनुसूचित जाती, वृद्ध व्यक्ती, तृतीयपंथीय समुदाय आणि समाजातील इतर दुर्बल घटकांच्या उत्थानासाठी विविध कल्याणकारी योजना राबवते. या विभागातर्फे शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य, रोजगार निर्मिती, गृहनिर्माण इत्यादी बाबींसाठी अर्थसहाय्य करण्यात येते.

**संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, सांगली**

# न रात्र होते, ना अंधार पडतो अशी जागा जेथे 4 महिने सूर्यच मावळत नाही, मग कसे झोपतात लोक ?



पृथ्वी सुर्याभोवती फिरताना स्वत:च्या अक्षा भोवतीही फिरत असते.यामुळे पृथ्वीच्या उत्तर आणि दक्षिण ध्रुवात काही देशात उन्हाळ्याच्या काही दिवसात सूर्य २४ तास मावळत नाही आणि सतत आकाशातच दिसत राहातो. या घटनेला 'मध्यरात्रीचा सूर्य' म्हणतात.कुठे घडते ही आश्चर्यकारक घटना आणि तेथील लोक झोपतात कसे ? पाहूयात...जग वेगवेगळ्या रहस्यांनी भरलेले आहे. एकाच वेळी कुठे रात्र असते तर कुठे दिवस असतो. भारतात जेव्हा दिवस असतो, तेव्हा अमेरिकेत रात्र असते. पृथ्वीच्या प्रदक्षिणेमुळे असे घडते.

परंतू तुम्हाला अशी जागा माहीती आहे जेथे चार महिने रात्रच होत नाही. सुर्य क्षितीजावरुन मावळतच नाही. येथे दिवसभर सुर्य तळपत असतो.यामुळे यास ङरपवे ष चळवपळसहीं डींप असेही म्हटले जाते.

पृथ्वीवरील हि जागा आहे नॉर्वेचा स्वालबार्ड (डींरश्रलरीव)हा प्रांत. येथे जवळपास ४ महिने सुर्य मावळतच नाही. दिवस असो वा रात्र उजेडच असतो. ही अनोखी घटना नॉर्वेतील या देशात २० एप्रिल ते २२ ऑगस्टपर्यंत असते.

जर तुम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत येथे गेला तर सुर्य मावळताना तुम्हाला दिसणारच नाही. या नैसर्गिक चमत्काराला लोक खूप एन्जॉय करतात. अनेक जण यास सणासारखा उत्सव करतात. काही तर दूर देशातून हा नजारा पाहण्यासाठी खास येथे येतात.

आता तुमच्या मनात सवाल आला असेल की रात्रीचा अंधारच जर होत नाही तर लोक झोपतात कसे ? यासाठी या देशात ब्लॅकआऊट पडद्यांचा वापर करतात. आणि झोपी जातात.

अशा ब्लॅक पडद्याने कृत्रिमपणे अंधार करुन लोक झोपतात. तर काही लोक डोळ्यांवर विमानात लावतात तशी मास्क पट्टी लावून झोपतात.आईसलँड, फिनलंड, स्वीडन आणि रशियाच्या काही भागांत मध्यरात्रीच्या सूर्याचा अनुभव घेता येतो. पण नॉर्वे हा त्याच्यासाठी अधिक प्रसिद्ध आहे.

पान ४ वरून पुढे...

## श्री ओंकारेश्वर...

महाराज (श्रीक्षेत्र चाकरवाडी) यांच्या हस्ते विधीवत प्राणप्रतिष्ठा, आशिर्वचन व महापूजन होणार आहे. यानंतर महामंगल आरती व दुपारी १ ते ४या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याअंतर्गत १६ जुलै रोजी बुधवारच्या दिवशी दुपारी ४ वाजता भव्य देव मिरवणूक काढण्यात येणार असून ती श्रीदत्त प्रसादालय, काळा हनुमान ठाणा, महावीर चौक, श्री तुळजाभवानी चौक मार्गे मंदिरात येणार आहे. १७ जुलै गुरुवारी विविध धार्मिक विधी जसे की पुण्याहवाचन, प्रधान पीठ हवन, जलाधिवास, धान्यादी वास, वस्त्र वास, शयन वास इत्यादी पार पडणार आहेत. या संपूर्ण धार्मिक महोत्सवाचे आयोजन श्री ओंकारेश्वर महादेव मंदिर भक्त परिवार, वत्तारवेस, विरशैव कॉलनी, बलभिम नगर, पेठ बीड यांच्या वतीने करण्यात आले असून, सर्व भाविक व श्रद्धाळूंनी यामध्ये सहभागी व्हावे व अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## समता परिवाराने...

शिक्षणाचा खर्च प्रचंड वाढलेला आहे. याविरोधात संघटितपणे

पान ४ वरून पुढे...

आवाज उठवण्याची गरज आहे, असे प्रतिपादन समता प्रतिष्ठानच्या विश्वस्त संगीता पाठक यांनी यावेळी केले. समताच्या सहकार्याने महिलांचे आयुष्य सुकर होत आहे. अडीअडचणी सुटत आहेत, एकमेकींच्या सहकार्याने कौटुंबिक व सामाजिक समस्या देखील महिला सोडवित आहेत आणि पुढे जात आहेत. त्यामुळे आमच्या सर्व अडचनीनमध्ये समताचा आम्हाला आधार वाटतो, अशा प्रतिक्रिया यावेळी महिलांच्या होत्या. सहकार अधिकारी श्री. सांगळे सर त्यांचे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की मी समतासारखी सभासदाच्या कल्याणाचा, एवढा समग्र विचार करनारी दुसरी पतसंस्था पहिली नाही. समता पतसंस्था नफ्याचा विचार न करता केवळ सक्षम महिला चळवळ बांधण्याचे काम करीत आहे, असे मला दिसते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे कार्यकर्ते अशोक दुबाले, कौशल्या बावणे, छाया गवळी, अनिता पडुळे, कल्पना वखरे, अयोध्या टपले,राणी कातखडे, शितल बळे यांनी परिश्रम घेतले.

## भूषण राऊत...

शेवटी अध्यक्षीय समारो विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई

पान ४ वरून पुढे...

आंधळे- डोईफोडे मॅडम यांनी व्यक्त करताना म्हणाल्या की,भूषण हा आपल्या शाळेचा हुशार विद्यार्थी होता आज आपल्या शाळेच भूषण ठरला आहे कारण त्याची निवड शिक्षण विभागात मंत्रालयीन सहाय्यक पदी झालेली आहे त्याबद्दल त्याचे मी शाळेच्या वतीने अभिनंदन करते व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देते तुम्ही पण असाच अभ्यास करा मोठ्या शासकीय पदावर पोहोचा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रम ासाठी विद्यालयातील मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## संत श्रेष्ठ...

सप्ताहातील कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री संत श्रेष्ठ सावता माळी सेवा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. परळी शहरातील जुने गावभागात असलेल्या संतश्रेष्ठ सावता महाराज मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी १७ ते २४ जुलै दरम्यान संतश्रेष्ठ सावता महाराज पुण्यतिथी समाधी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या निमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार यांचे दररोज सायंकाळी ७ ते ९ हरिकीर्तन आयोजित करण्यात आले असून सप्ताहाच्या पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा ह भ प वेदांताचार्य शिरसागर महाराज उखळीकर तर दिनांक १८ जुलै

पान ४ वरून पुढे...

रोजी ह भ प भागवताचार्य डॉक्टर विठ्ठल महाराज वासुदेव चौरे पंढरपूर, दिनांक १९ जुलै रोजी ह भ प भागवताचार्य तुकाराम महाराज मुंडे शास्त्री टोकवाडी दिनांक २० जुलै रोजी ह भ प भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज उखळीकर परळी २१ जुलै रोजी ह भ प वेदांताचार्य जगन्नाथ महाराज देशमुख श्रीक्षेत्र पंढरपूर दिनांक २२ जुलै रोजी ह भ प राष्ट्रीय कीर्तनकार रामकृष्ण महाराज रंधवे बापू पाटोदा २३ जुलै रोजी ह भ प प्राचार्य योगीराज महाराज गोसावी श्रीक्षेत्र पैठण २४ जुलै रोजी ह भ प भागवताचार्य विठ्ठल महाराज उखळीकर यांचे सकाळी दहा ते बारा यादरम्यान काल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर गुरुवार दिनांक २४ रोजी दुपारी परळी शहरातून भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे त्यानंतर सायंकाळी पाच नंतर महाप्रसादाचे आयोजन श्री संत सावता महाराज मंदिर येथे करण्यात आले आहे दरम्यान सात दिवस चालणाऱ्या या सप्ताहात महाराष्ट्रातील कीर्तनकार टाळ मृदंग तसेच गायनाचार्य व भारुड कर असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सप्ताहातील विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत श्रेष्ठ सावता माळी सेवा समाज परळी वैजनाथ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

पान १ वरून पुढे...

## जेथे देशाच्या सिमेचे...

कापून सोन्याचे दागिने लंपास करून चोरांनी चोरी करून पळून गेले. त्याची फिर्याद यसुफ वडगाव पोलीस स्टेशनला देऊन सुद्धा एपीआय शेंडगे यांनी आज पर्यंत काहीच तपास केला नाही. चोरी होऊन साधारणतः दोन महिन्यांचा कालावधी उलटला. तरी तपासात कुठल्याही प्रकारची आजपर्यंत प्रगती झालेली नाही. मी देशसेवा बजावत असताना आई – वडिलांनी सांगितलेली ही घटना ऐकून तात्काळ मी गावाकडे रवाना झालो. लगेच बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांना भेटलो. या संदर्भात सर्व माहिती दिली. तरीही याबद्दल आतापर्यंत कोणतेच ठोस पाऊल उचलले गेले नाही. या चोरांनी शेतातील आसपास परिसरामधील बरेच जणांचे लोखंड, कोंबड्या, शेळी अशा अनेक प्रकारांच्या चोऱ्या करून हे चोर मोठ्या प्रमाणामध्ये आता चोरी करण्यास तयार झालेले आहेत. आज माझ्या आईचे कान कापून सोन्याचे दागिने लंपास केले. उद्या यामध्ये कुठली तरी जीवितहानी होणार असे मला वाटते. यावर तात्काळ बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी कारवाई करावी व जातीने लक्ष द्यावे अशी विनंती आहे. मी देश सेवा बजावत असताना माझ्या आई–वडिलांना त्रास होऊ नये हीच माझी अपेक्षा आहे. पण, अशा गंभीर घटनांमुळे देश सेवा करीत असताना माझे मन लागत नाही. आई–वडील भयभीत झाल्यासारखे राहत आहेत यावर पोलीस अधीक्षक लक्ष द्यावे अशी विनंती सैनिक सुग्रीव लाड यांनी केली आहे.

## संभाजी ब्रिगेडच्या...

प्रवीण गायकवाड यांना काळं फासलं. काळं फासणारे लोक हे शिवधर्म फाउंडेशनचे कार्यकर्ते असल्याचं सांगण्यात येत आहे.

पान १ वरून पुढे...

शिवधर्म फाऊंडेशनचा होता राग– प्रवीण गायकवाड यांनी आपल्या संघटनेच्या नावामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याने शिवधर्म फाउंडेशन आक्रमक होते. त्याचबरोबर स्वामी समर्थांचा एकेरी उल्लेख करून त्यांचा अवमान केल्याचादेखील राग या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या मनात होता. यापूर्वी शिवधर्म फाउंडेशनने संभाजी ब्रिगेडच्या विरोधात उपोषणदेखील केले होते.

कशा पद्धतीने फासलं काळं ?

प्रवीण गायकवाड हे संभाजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष आहेत. एकूण दोन संभाजी ब्रिगेड आहेत. गायकवाड हे दुसऱ्या संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष आहेत. ते महाराष्ट्रभर दौरे करत असतात. ते आज अक्कलकोटमध्ये एका कार्यक्रमाला आले होते. कार्यक्रमस्थळी दाखल होत असतानाच शिवधर्म फाऊंडेशनचे कार्यकर्ते तेथे जमा झाले आणि गायकवाड यांना काळे फासण्यात आले.

प्रवीण गायकवाड यांना मारहाण?– शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळं फासल्यानंतर प्रवीण गायकवाड हे कारमध्ये जाऊन बसले. पण शिवधर्म फाऊंडेशनचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. त्यांनी कारमध्ये घुसून गायकवाड यांना मारहाण केली. त्यानंतर रस्त्यावरही त्यांना मारहाण झाल्याचे समोर आले.

## लातूर हादरले...

मारहाण करतानाचे दृश्य दिसत आहे.विशेष म्हणजे, इतकी गंभीर घटना समोर येऊनही या प्रकरणी अद्याप कोणतीही पोलिस तक्रार दाखल झालेली नाही. दरम्यान, हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी गाझियाबाद उत्तर प्रदेश येथेही असाच एक प्रकार उघडकीस आला होता. सीसीटिव्हीत, एक महिला वृद्ध महिलेला

पान १ वरून पुढे...

मारहाण करताना दिसत आहे. १ जुलै रोजीची ही घटना असून व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ही घटना उजेडात आली आहे. आकांक्षा असं सुनेचे नाव असून ती सासू सुदेशा देवी हिला जबरदस्ती हाताला धरून पायऱ्यांवरुन खेचत असल्याचे या व्हिडिओत दिसत आहे. इतकंच नव्हे तर, आकांक्षाची आईदेखील तिला थांबवण्याच्या ऐवजी मदत करताना दिसत आहे. सुदेशा देवी यांनी अनेकदा आकांक्षाविरोधात तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी दखल घेतली नाही, असा दावा त्यांनी केला आहे.

## तालुकाध्यक्ष गणेश...

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या शाखेचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी योगेश गंगाराम बहिरवाल, राजु मुसा शेख, रिजवान पठाण, रेवण खटाने, राजेंद्र घोशीर, संतोष बेदरे, इरफान इनामदार, मोहसीन सय्यद, अमीर इनामदार, आरशान इनामदार यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी शेख कादर बाबामिया इनामदार यांची बीड तालुका उपाध्यक्ष पदी फेर निवड करण्यात आली असुन त्याच बरोबर पाली सर्कल प्रमुख पदी योगेश गंगाराम बहिरवाल यांची निवड करण्यात आली.

गणेश बजगुडे पाटील यांचा राजकीय अनुभव, संघटनात्मक कौशल्य व तालुक्यातील वाडी वस्ती तांड्यापर्यंत असलेला प्रत्यक्ष लोकसंपर्क यामुळे तालुक्यात काँग्रेस पक्षाला पुन्हा एकदा नवसंजीवनी निर्माण होवुन येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार विजयी होऊ शकतो.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे म्हणाले की, बीड

पान १ वरून पुढे...

जिल्हा हा काँग्रेस विचाराचा जिल्हा असुन बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा मोठा मतदार आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत आघाडीचे उमेदवार विजयी करण्यात काँग्रेसचा मोठा वाटा आहे परंतु आघाडीच्या राजकारणात काँग्रेसला नेहमीच दुय्यम स्थान मिळाले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष स्वतंत्र निवडणूक लढवणार असुन सर्वसामान्य कार्यकर्त्यांना लढण्याची संधी व बळ दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, बीड तालुक्यात काँग्रेसने अनेकाना मोठे केले परंतु ते स्वतःच्या स्वार्थासाठी पक्ष सोडून गेले परंतु जनता मात्र आजही काँग्रेस सोबत आहे. सर्वसामान्य शेतकरी, कष्टकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी काँग्रेस पक्ष व आम्ही सर्व कटिबद्ध असुन येणाऱ्या काळात जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने काँग्रेस पक्ष बीड तालुक्यात पुन्हा मजबुत दिसेल असेही ते म्हणाले यावेळी बीड तालुक्यातील मंजेरी हवेली, तेलगाव रोड येथील बाबामिया इनामदार नगर याठिकाणी शाखेचे उद्घाटन करुन गाव तिथे शाखा अभियानास सुरुवात करण्यात आली. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे, तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, सरपंच संतोष सोनवणे, तालुका उपाध्यक्ष शेख कादर बाबामिया इनामदार, पाली सर्कल प्रमुख योगेश बहिरवाल, मंजेरी हवेली शाखा प्रमुख राजु शेख, उपाध्यक्ष रेवण खटाने, सचिव बाबासाहेब बहिरवाल, सहसचिव रिजवान पठाण, कोषाध्यक्ष राजेंद्र घोषिर, संघटक संतोष बेदरे, बाबामिया इनामदार नगर शाखेचे अध्यक्ष इरफान इनामदार, उपाध्यक्ष मोहसीन सय्यद, सचिव अमीर इनाम दार, सहसचिव आरशान इनामदार, यांच्यासह रणजीत शेळके, भैय्या गोरे, ओम नवले आदी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शांताई अर्बन तर्फे साहित्य वाटप, वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



**बीड । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, बीड यांच्या म ार्गदर्शनाखाली शांताई अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. बीड यांच्या वतीने सामाजिक उपक्रम ांचे भव्य आयोजन करण्यात आले.

रविवार, दिनांक १३ जुलै २०२५ रोजी तपोभूमी वाघदरा - ब्रह्मपूर, ईमामपूर येथील आश्रमात हे उपक्रम पार पडले. आश्रमातील ५२ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व ब्लड टेस्ट करण्यात आली. यामध्ये त्यांचे ब्लड ग्रुप तपासून देण्यात आले. त्याचप्रमाणे शालेय साहित्य वाटप, परिसराच्या हरित विकासासाठी वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला आणि सार्वजनिक आश्रमा साठी आवशक असणाऱ्या बाकड्यांचे वाटप करून समाजाभिमुख कार्य करण्यात आले.

या उपक्रमासाठी शांताई अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, गोरख गायकवाड, काटे मामा, गणेश जाधव, काळे सर, योगेश गवळी आणि विशेषतः या उपक्रमाच्या आयोजनामध्ये मोलाची भूमिका बजावणारे अब्बा कदम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात बोलताना डॉ. ज्ञानेश्वर शिंदे यांनी आश्रमातील महाराजांच्या शिस्तीचे, शिक्षणपद्धतीचे तसेच वातावरणाचे विशेष कौतुक केले. तसेच त्यांनी आश्रमातील विद्यार्थी आणि व्यवस्थापनाच्या कार्यक्षम तेचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

संपूर्ण कार्यक्रम अतिशय प्रेरणादायी आणि यशस्वी झाला असून, स्थानिक ग्रामस्थ, विद्यार्थी व पालक यांनी उपक्रमाचे कौतुक केले आहे. शांताई अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीने आरोग्य, शिक्षण व पर्यावरण या त्रिसूत्रीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

---

दैनिक मराठवाडा पत्र

**टी.सी. हरवला आहे.**

अभय आत्माराम जमाले या नावाचा इयत्ता १२ वी चा टि.सी वडवणी ते बीड प्रवासात हरवला आहे.
सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.
**संपर्क : ९४२३३७८०८०**

---

दैनिक मराठवाडा पत्र

**टि.सी हरवला आहे.**

कृष्णा वसंत आडे या नावाचा इयत्ता १२ वी चा टि.सी अंबेजोगाई ते बीड प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.
**संपर्क नं. : ९९२१२२६९१४**

---

दैनिक मराठवाडा पत्र

**महत्त्वाचे कागदपत्रे हरवले आहे.**

श्री. ज्ञानेश्वर रखमाजी थापडे रा. ढेकणमोहा ता. जि. बीड यांचा १२ वी. पासचा गोरक्षनाथ कनिष्ठ महाविद्यालय ढेकणमोहाचा दाखला (T.C) हा छत्रपती संभाजीनगर ते बीड बसने प्रवास करीत असताना हरवला आहे. तरी सदरचा १२ वी. पास दाखला (T.C) कोणास सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा ही विनंती.
**संपर्क : श्री. ज्ञानेश्वर रखमाजी थापडे, रा. ढेकणमोहा ता. जि. बीड**
**मो. ९७६५५११५०७ / ९४२१३३५०६६**

---

दैनिक मराठवाडा पत्र

**टी सी व इतर कागदपत्रे हरवले आहेत.**

प्रथमेश प्रसाद देशमुख यांचा दहावी पास चा टीसी व मार्क मेमो व इतर कागदपत्रे बीड चौसाळा प्रवास करताना एसटीमध्ये हरवले आहेत कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.
**संपर्क : ७७४५०६०९९८**

---

## जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचे कार्यालय

**शासकीय ईमारत, चांदमारी वसाहत, धानोरा रोड, बीड- ४३११२२**

**दुरध्वनी क्र.०२४४२-२९९१४०** **ई-मेल** dsorbeed@yahoo.com

क्रमांक/आस्था-२/एस. आर. १६० / २०२४/२५ — बीड दिनांक- ०४/०७/२०२५

### जाहीर सुचना

प्रति,
अपीलदार: १. मारोती नामदेव काकडे (मयत) वारस ,
१) वामन मारोती काकडे,
२) सुधाकर मारोती काकडे
३) भागवत मारोती काकडे (मयत) वारस
३/१) दादासाहेब भागवत काकडे, ३/२) रणजित भागवत काकडे
सर्व रा.मु. जरूड पो. शिवणी ता. जि. बीड

विरुध्द

जाबदार : १. १) उपअधिक्षक भुमी अभिलेख, बीड, २) तलाठी सज्जा, जरूड, ३) प्रकाश बप्पासाहेब काकडे, ४) सागरबाई बाबासाहेब काकडे, ५) गंगुबाई प्रकाश काकडे, ६) कृष्णा प्रकाश काकडे ७) पांडूरंग श्रीमंतराव काकडे, ८) दिपक श्रीमंतराव काकडे ९) सुहास श्रीमंतराव काकडे, १०) बबीताबाई शामराव, ११) रामा नामदेव काकडे, १२) गहीनीनाथ शामराव काकडे, १३) नवनाथ एकनाथ काकडे, १४) बळीराम साहेबराव काकडे, १५) लक्ष्मण साहेबराव काकडे, १६) केशव साहेबराव काकडे, १७) बन्सी साहेबराव काकडे, १८) ज्ञानेश्वर साहेबराव काकडे, १९) बाबासाहेब बळीराम काकडे, अ.क्र. २ ते १९ रा. जरूड पो. शिवणी ता. जि. बीड, २०) शहादेव सुदाम कुटे, २१) गोवर्धन परभत कुटे, २२) मुकंदा गोविंदा कुटे, २३) संजय गोविंदा कुटे, २४) शिवाजी गोविंदा कुटे, २५) सखाराम रामभाऊ कुटे २६) चंद्रकांत गोविंदा कुटे, २७) त्रिशाला अंकुशराव कुटे, २८) राजकुमार अंकुशराव कुटे, २९) नंदकुमार अंकुशराव कुटे, अ.क्र. २० ते २९ रा. कुटेवाडी पो. शिवणी ता. जि. बीड, ३०) शेषेराव दामोधर येवले, ३१) मच्छिंद्र नामदेव जाधव, अ.क्र. ३० ते ३१ रा. बाभुळखुंटा पो. मौज ता. जि. बीड, ३२) चंद्रकांत हनुमान चन्ने, रा. गुंधा (वडगांव) पो. पिंपळनेर ता. जि. बीड, ३३) सुजाता सुभाष सपकाळ रा. भक्ती कन्स्ट्रक्शन, नगर रोड, बीड ता. जि. बीड

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरुध्द जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे न्यायालयात मौजे जरूड ता. जि. बीड येथील सर्व्हे नं. १०५ मधील पोट-हिस्सा मोजणी फाळणी बारा फेरफार क्र. ३११ अन्वये हिस्सा क्र. ४ व ५ पुरवणी सातबारा बाबत अपील महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गैरजअर्जदार यांना जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, वरील प्रकरणी दिनांक ०६/०८/२०२५ रोजी वेळ सकाळी / दुपारी ११:३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय, चाँदमारी शासकीय वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड यांचे समोर सुनावणी आहे. वरील नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणीस उपस्थीत रहावे.

**वरील नमुद गैरअर्जदार, वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

शिक्का

**स्वाक्षरीत/-**
**(कृष्णा शिंदे)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड**

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी. के. पाटील साहेब ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ७६६/२०२५**
**श्रीमंत विरुध्द निरंक**

अर्जदार :- १) श्रीमंत पि.वामनराव खराडे वय ७६ वर्षे धंदा शेती २) आश्रूबा पि.वामन खराडे वय ६२ वर्षे धंदा शेती ३) संदिपान - पि. वामन खराडे वय ५१ वर्षे धंदा शेती सर्व रा.म्हाळसापूर, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे **वामन पि. रावसाहेब खराडे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत नामे वामन पि. रावसाहेब खराडे रा. म्हाळसापूर ता. जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : ०८.०३.२०११ रोजी म्हाळसापूर ता.जि.बीड येथे झाला. अर्जदार क १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रम णपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत- कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांना सदरहु मयत वामन पि. रावसाहेब खराडे यांचे देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०५/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
**सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १२/०८/२०२५**
**(ॲड. रोटे डी. एम.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती. एस. डी. सोनी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १०८४/२०२५**
**शांताबाई विरूध्द निरंक**

अर्जदार - १. शांताबाई अ. हरिभाउ धसे, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. मंझरी हवेली, ता.जि. बीड, २. तुकाराम पि. हरिभाउ धसे, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे, ३. अशोक पि. हरिभाउ भसे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, य. वरील प्रमाणे, ४.मंगल सर्जेराव बहिरवाळ, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे, ५. पार्वती राजेंद्र गुजर, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. नाळवंडी, ता.जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत हरिभाउ माणिकराव धसे,** यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत हरिभाउ माणिकराव धसे, यांचा मृत्यु दिनांक ०७/११ / २०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत हरिभाउ माणिकराव धसे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत हरिभाउ माणिकराव धसे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०७/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.
**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ११/०८/२०२५ आहे.**
**(ॲड. एम. डी. धांडे यांचे मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०६९/ २०२५**
**मैनावती वि. निरंक**

ज्याअर्थी - लहु गंगाराम खंदारे, हे दिनांक १४.०७.२०२४ रोजी कारेगव्हाण, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी-
१ मैनावती भ्र. लहु खंदारे, वय- ४० वर्षे, धंदा - घरकाम रा. कारेगव्हाण, ता. जि. बीड
२. राजेंद्र पि. लहु खंदारे, वय- २२ वर्षे, धंदा- शेती रा. वरील प्रमाणे
३. लक्ष्मण पि. लहु खंदारे, वय - १७ वर्षे, धंदा - शिक्षण अज्ञान
अ.पा.क. आई, अर्जदार न. १ रा. वरील प्रमाणे.
४. सुवर्णा भ्र. सदाशिव दाराडे, वय- २३ वर्षे, धंदा - घरकाम रा. कारेगव्हाण, ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे तसेच अर्जदार क्र. २ व ३ हे मयताची मुले असुन अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना / अर्जदाराला सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ०७.०८.२०२५ ही आहे.**
**(ॲड. एस. बी. शिंदे यांचे मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १०७० / २०२५**
**पार्वती विरुद्ध निरंक**

अर्जदार- १. पार्वती भ्र. नवनाथ खंदारे, वय - ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कारेगव्हाण, ता. जि.बीड, २. हनुमंत पि. नवनाथ खंदारे, वय २५ वर्षे, धंदा- शेती, रा. वरील प्रमाणे, ३. मीरा भ्र. श्रीराम नागरगोजे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. भवानवाडी,ता.जि.बीड ४. ताई भ्र. बापुराव घुगे, वय - २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. कारेगव्हाण, ता. जि. बीड. ५. कांती भ्र. गणेश वडणे, वय २१ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिखलबीड, ता.वडवणी जि.बीड

**मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नवनाथ पि. गंगाराम खंदारे मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत नवनाथ पि. गंगाराम खंदारे यांचा मृत्यु दिनांक २१/१०/२०२३ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत नवनाथ पि. गंगाराम खंदारे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निम शासकीय कामासाठी मयताचे सदरहू अर्जदार सदरहू सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत नवनाथ पि. गंगाराम खंदारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०७/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.
**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०८/२०२५ आहे.**
**(ॲड. एस. बी. शिंदे यांचे मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. कतिका एस.खांडरे ३ रे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १०६३/२०२५**
**लक्ष्मणराव विष्णुपंत काळे वि. निरंक**

ज्यापेक्षा विष्णु उर्फ विष्णुपंत पि. रामभाऊ काळे, हे दिनांक ३१.०७.१९९९ रोजी मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत. आणि तसेच अर्जदार
१. लक्ष्मणराव पि. विष्णुपंत काळे, वय- ५४ वर्षे, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड
२. रामेश्वर पि. विष्णुपंत काळे, वय - ५२ वर्षे, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड

अर्जदार १ व २ हे **मयत नामे विष्णु उर्फ विष्णुपंत पि. रामभाऊ काळे,** यांचे मुले आहेत. तसेच मयताची पत्नी नामे तान्हाबाई भ्र. विष्णु उर्फ विष्णुपंत काळे या अंदाजे ३० वर्षापुर्वी मयत झालेल्या आहेत. तसेच मयताचे आई-वडील हे ब-याच वर्षापुर्वी मयत झाले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचं म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मि ळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत विष्णु उर्फ विष्णुपंत पि. रामभाऊ काळे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख १४/०८/२०२५ आहे.**
आज दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.
**(ॲड. जी.बी. कोल्हे यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ७६९/२०२५**
**रावसाहेब भिमाजी मुंडे वि. निरंक**

अर्जदार- रावसाहेब पि. भिमाजी मुंडे, वय - ९६ वर्षे, धंदा-शेती, रा. भवानवाडी ता.जि.बीड
गैरअर्जदार :- निरंक

**प्रकरण:- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत भिमाजी पि. मल्हारी मुंडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत **भिमाजी पि. मल्हारी मुंडे हे दिनांक १४/०५/२००९ रोजी भवानवाडी ता. जि.बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हा मयताचा एकुलता एक मुलगा आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे भिमाजी पि मल्हारी मुंडे रा. भवानवाडी ता.जि.बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील तारीख १३/०८/२०२५.**

आज दिनांक ०३/०५/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.
**(मार्फत- अँड. रोटे डी. एम.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती वंदना व्ही. जोशी दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. १०६४/२०२५**
**श्रीमती मिरा संजय शिंदे वि. निरंक**

अर्जदार- १. श्रीमती मीरा भ्र. संजय शिंदे, वय - ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. जेबापिंप्री ता.जि.बीड, ह.मु. आयोध्या नगर, वडगांव कोल्हाटी, छत्रपती संभाजीनगर, २.चि. धम्मपाल पि.संजय शिंदे, वय-२४वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर, ३. चि. चेतन भ्र. संजय शिंदे, वय-२० वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

**प्रकरणः- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत कै. संजय रावण शिंदे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत **कै. संजय रावण शिंदे हे दिनांक २७/०८/२०२३ रोजी घाट हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे कै. संजय रावण शिंदे रा.जेबापिंप्री ता.जि.बीड ह. मु. आयोध्या नगर, वडगांव कोल्हाटी, छत्रपती संभाजीनगर यांचे अर्जदार हेच मयताचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख १३/०८/२०२५.**
आज दिनांक ०७/०७/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.
**(मार्फत- अँड. रोटे डी. एम.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. के सी बागल मॅडम, ६ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड, ता.जि.बीड यांचे न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक : ८३६/२०२५**
**विमल व इतर -वि- निरंक**

ज्याअर्थी मयत नामे एकनाथ पि. रामभाऊ पवार रा. भवानवाडी ता.जि.बीड हे दि. १९११.२०१३ रोजी मौजे भवानवाडी ता.जि.बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १) विमल एकनाथ पवार २) विलास एकनाथ पवार ३) राहुल एकनाथ पवार (४) पुजा एकनाथ वपार अ.पा.क आई अर्जदार क्र. १, ५) मिराबाई रामभाउ पवार सर्व रा. भवानवाडी ता. जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **एकनाथ पि. रामभाऊ पवार रा. भवानवाडी ता.जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज १३/०५/२०२५ रोजी माझ्या स्वाश्वरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
**पूढील तारीख १९/०७/२०२५**
**( मार्फत- ॲड. जी.एम. केकान बीड)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## जाहीर प्रगटन

**मा.श्री कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १०२१/२०२५**
**सुनिता व इतर वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.
अर्जदारः १) सुनिता भ्र. आश्रुबा निर्मळ, वयः ५२वर्षे, धंदा घरकाम, रा. नेकनुर ता. जि. बीड, २) सागर पि. आश्रुबा निर्मळ, वयः २८वर्षे, ३) पुनम पि. आश्रुबा निर्मळ, वयः ३२ वर्षे,धंदा : मजुरी, रा. वरील प्रमाणे, धंदा : मजुरी, रा. वरील प्रमाणे, ४) रेणुका भ्र .प्रविण झिगे, वयः २६ वर्षे, धंदा घरकाम, रा. दाभरूळ (एकतुणी), ता. जि. छ. संभाजीनगर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत **नामे आश्रुबा पि.शंकर निर्मळ, राहणार नेकनुर, ता. जि. बीड हे दिनांक १५/०६/२०२५ रोजी नेकनुर ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नीं असुन अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आणि अर्जदार नं ३ व ४ मयताचे मुले आहेत व अर्जदार नं. ४ ते ७ ह्या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आईवडील या पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे आश्रुबा पि.शंकर निर्मळ, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत आश्रुबा पि.शंकर निर्मळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०८/२०२५ आहे.**
आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.
**(विधीज्ञ श्री. शिंदे एस. बी.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे ११ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज १०१५/२०२५**
**सरोज विरुध्द निरंक**

अर्जदार :- (१) सरोज रमेश बागडे, वय ६३ वर्ष, धंदा घरकाम, रा. विद्यानगर पुर्व, बार्शी रोड, बीड, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सोनल रमेशराव बागडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत सोनल रमेशराव बागडे यांचा मृत्यु दि. ३०/०४/२०२५ रोजी नवजीवन हॉस्पीटल, बीड, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार ही मयताची आई आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास सम जाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सोनल रमेशराव बागडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३० माहे जून २५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
**सदर प्रकरणाची पुढील तारीख. दि. १२ ऑगस्ट २०२५.**
(ॲड. जी. पी. शिंदे)

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **क.लिपीक**

---

## जाहीर प्रगटन

मी, सतिश तोटावार, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड खालील संघीय संस्थांच्या समिती सदस्यांच्या सन २०२५ २०२६ ते २०३०-२०३१ या कालावधीसाठीच्या होणाऱ्या निवडणूक घेणेबाबत मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी ठरवुन दिलेल्या दि. ०१/०१/२०२५ या अर्हता दिनांकावर पात्र सभासद संस्थांच्या प्रतिनिधीचे ठराव नामनिर्देशन पत्र दाखल करणे, सुचविणे, अनुमोदन देणे व मतदान करणे या साठी मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | संघीय संस्थेचे नाव | ठराव दाखल करण्याचा कालावधी | वेळ | ठराव दाखल करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघ, म. शिरुर का, ता. शिरुर का., जि. बीड | दि.१४/०७/२०२५ ते दि. १२/०८/२०२५ | सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. शिरुर का. जि. बीड |

इतर सविस्तर सूचना संबधीत तालुक्याचे सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. शिरुर का., जि.बीड यांचे कार्यालयात पहावयास मिळतील.

**दि. १४/०७/२०२५**
**स्थळ : बीड**

(स्वाक्षरीत)
**(सतिश तोटावार)**
**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड**

दैनिक
● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
सोमवार, दि.१४ जुलै २०२५ पान ४

## श्री ओंकारेश्वर महादेव मंदिरात पुनः प्राणप्रतिष्ठा, नंदी स्थापना व कलशारोहन सोहळा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बलभिम नगर पेठ येथील विरशैव कॉलनीमधील जागृत व पावन देवस्थान श्री ओंकारेश्वर महादेव मंदिरात पुनः प्राणप्रतिष्ठा, नंदी स्थापना व कलशारोहन सोहळा मोठ्या भक्तिभावात संपन्न होणार आहे. हा भव्य धार्मिक सोहळा शुक्रवार १८ जुलै २०२५ रोजी सकाळी १०:१७ वाजता या स्थिर मुहूर्तावर संपन्न होणार आहे. या पावन प्रसंगी श्रीगुरु ष. ब्र.१०८ विरुपाक्ष शिवाचार्य महाराज (मठाधिपती, जहागिरदार मठ संस्थान, मानुर) व ह.भ.प. महादेव महादेव ▶▶ उर्वरित पान २ वर



# यावर्षी वाढदिवस सोहळा साजरा करणार नाही : धनंजय मुंडे

**• सहकारी - कार्यकर्त्यांनी बॅनर, जाहिराती ऐवजी सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन**
**• १५ जुलै रोजी भेटीसाठी उपलब्ध नसणार - मुंडेंच्या कार्यालयाकडून माहिती**

परळी वै. । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचा येत्या १५ जुलै रोजी वाढदिवस असून, यावर्षी आपण वाढदिवस साजरा करणार नसून सहकारी व कार्यकर्त्यांनी वाढदिवसाचे सोहळे आयोजित करू नयेत, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

धनंजय मुंडे यांचा वाढदिवस हा दरवर्षी चाहते व कार्यकर्त्यांसाठी मोठी पर्वणीच असतो, मात्र यावर्षी मराठवाड्यात बहुतांश भागात पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आहे, दुसरीकडे नुकतेच जवळचे सहकारी स्व. आर. टी. देशमुख यांचे झालेले निधन आदी बाबींचा विचार करून धनंजय मुंडे यांनी



वाढदिवस साजरा करणार नसून, सहकारी – कार्यकर्त्यांनी बॅनर बाजी, जाहिराती आदिंवरील खर्च टाळून त्याऐवजी सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले आहे.

धनंजय मुंडे यांना काही दिवसांपूर्वी बेल्स पाल्सी या आजाराचे निदान झाले होते. त्यानंतर विविध उपचार घेऊन मुंडेंनी इगतपुरी येथील ध्यान केंद्रात विपश्यना देखील केली.

आ. धनंजय मुंडे हे येत्या १५ जुलै रोजी ध्यानसाधना करणार असून, ते वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा स्वीकारण्यास परळी वैद्यनाथ किंवा मुंबई वा अन्य कुठेही उपलब्ध असणार नाहीत, असे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

## समता परिवाराने उभी केली महिला सक्षमीकरणाची चळवळ : सिद्धेश्वर सांगळे सहकार अधिकारी

बीड । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्ताने समता प्रतिष्ठान बीड, समताशक्ती पतसंस्था, समता महिला बचत गट पतसंस्था, कॉ. अरुणा असफ अली सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने एकल महिला यांच्या मुलींच्या शिक्षणासाठी समता विद्यापूर्णा शैक्षणिक शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रम आज दि. १३ जुलै २०२५ रोजी समता प्रतिष्ठान कार्यालय बीड येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमात एकूण ४० विध्यार्थिनीना विद्यापूर्णा शिष्यवृत्ती अंतर्गत रोख रू. २५००/– रक्कम श्री. सिद्धेश्वर सांगोळे, अधिकारी, उपनिबंधक कार्यालय बीड, संतोष बीपी, संगीता पाठक (संस्थापक, समता प्रतिष्ठान), किरण घाटगे (सचिव), श्री. संदीप अदमाने, उद्योजक, सय्यद झुल्फिकार (कार्यकारी संपादक, दै. सिटीझन) बीड यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आली. ही शिष्यवृत्ती रोख स्वरूपात देण्यात येते. तसेच ती शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी प्रदान करण्यात येत असली तरी कोणते शैक्षणिक साहित्य खरेदी करावे याचे पूर्ण स्वातंत्र्य त्या विद्यार्थीनी व त्यांच्या पालकाना असते.



आपल्या सभासद असलेल्या एकल महिलांच्या मुली D.pharm,NM, Engg. Btech, polytechnic, fashion design यासह B, Bcom,MA ,BSc आदी अभ्यासक्रमात आहेत हे पाहून मनस्वी आनंद होत आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांकडून विहित नमुन्यात अर्ज भरून घेतला गेला व शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली.

एकल पालक जे आहेत, त्यांना कुटुंबाचा उपजीविकेचा खर्च भागवावा की मुलांचा खर्च भागवावा ही विवंचना असते. कारण उत्पन्न अतिशय तुटपुंजे असते. त्यातच शिक्षणाचे बाजारीकरण झालेले असल्याने

▶▶ उर्वरित पान २ वर

# भूषण राऊत याची मंत्रालयात शिक्षण सहाय्यकपदी निवड; महाराणी ताराबाई विद्यालयाच्या वतीने सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी आणि डी.डी.राऊत यांचे चिरंजीव भूषण धुराजी राऊत यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग ( एमपीएससी )मार्फत शिक्षण विभागात मंत्रालयीन सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल शनिवार दि.१२ जुलै २०२५ रोजी महाराणी ताराबाई विद्यालयाच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे–डोईफोडे मॅडम तर प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे संस्थेचे संचालक इंजि. अशोक भैय्या आंधळे तसेच डी. डी.राऊत,विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,हिंदी विषयाचे जेष्ठ अध्यापक श्री.डोईफोडे सर आदींमान्यवर म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यालयाच्या वतीने हार, शाल, फेटा, बुके देऊन सत्कारमूर्ती



चि.भूषण धुराजी राऊत यांच्या सत्कार करण्यात आला त्यानंतर डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धापरीक्षा पास झाल्याबद्दल चि.पृथ्वीराज रामभाऊ घोडके याचाही हार,शाल, फेटा, बुके देऊन सत्कार केला.

सत्कारमूर्ती भूषण राऊत यांनी सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले की,आपल्या महाराणी ताराबाई शाळेमध्ये इयत्ता–५ वी ते १२ वीचे शिक्षण मी घेतले याच शाळेत मी घडलो विद्यार्थी मित्रांनो तुम्ही पण चांगले शिका अभ्यास करा मोठ्या शासकीय पदावर पोहोचा असे बोलून सत्कार केल्याबद्दल त्यांनी आभार मानले त्यानंतर सत्कार मूर्तीचे पालक डी.डी.राऊत यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की,विज्ञान, इतिहास, नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल याच विषयातील एमपीएससी परीक्षेमध्ये प्रश्न येतात त्यामुळे या विषयाचा सखोल अभ्यास करा असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले

▶▶ उर्वरित पान २ वर

## सिध्देश्वर महाविद्यालयाच्या विकास समितीवर डॉ.स्वानंद कुलकर्णी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्याच्या पंचक्रोशीत समाजाभिमुख नेत्ररोग तज्ञ डॉक्टर म्हणून परिचित असलेले स्वानंद कुलकर्णी यांची

येथील सिध्देश्वर महाविद्यालयाच्या विकास समिती संस्था प्रतिनिधी पदी निवड करण्यात आली आहे.

रेणकाई नेत्र रूग्णालयाचे डॉ. स्वानंद कुलकर्णी तालुक्यात समाजात समाजाभिमुख काम करणारे डॉक्टर म्हणून परिचित आहेत.अनेक सामाजिक कामात त्यांचे योगदान असते. नेत्ररोग तज्ञ म्हणूनही त्यांचे काम कौतुकास्पद आहे.कमी खर्चात त्यांच्या हॉस्पिटलमध्ये रुग्णांवर उपचार केले जातात.डॉ.स्वानंद



कुलकर्णी, रोटरी क्लबच्या माध्यमातून अनेक ठिकाणी काम करताना दिसतात.आता शहरात नावाजलेली शिक्षण संस्था सिध्देश्वर महाविद्यालयाच्या विकास समिती प्रतिनिधीपदी निवड करण्यात आली आहे.या निवडीबद्दल त्यांना सर्वच क्षेत्रातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# शिवम मशीनरी अँड इलेक्ट्रिकल्स दुकानात चोरी; लाखोचा माल लंपास

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील श्रीराम पाठक यांच्या मालकीच्या शिवम मशीनरी अँड इलेक्ट्रिकल्स या दुकानात बुधवारी रात्री चोरीची घटना घडली.

श्रीराम पाठक हे काल गेवराई येथे नातेवाईकांच्या लग्नास गेल्यामुळे दुकान दिवसभर बंद होते. गुरुवारी सकाळी अशोक वायभट यांनी फोन करून दुकानाचे शटर तुटले असल्याची



माहिती पाठक यांना दिली. त्यांनी तात्काळ दुकानात धाव घेतली असता, चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश करून वायंडिंग वायर, स्क्रॅप यासह एकूण अंदाजे ५.५ ते ६ लाख रुपयांचा माल लंपास केल्याचे समोर आले. तसेच दुकानातील गल्ला फोडून त्यामधील ५ ते ६ हजार रुपये चोरीला गेल्याची माहिती श्रीराम पाठक यांनी दिली.

घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस ठाण्याचे पोउनि. अप्पासाहेब रोकडे, पो. विशाल क्षीरसागर तसेच लिंबागणेश पोलीस चौकीचे स.फौ. बाबासाहेब राख, गोविंद बडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या चोरीप्रकरणी सपोनि. चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# संत श्रेष्ठ सावता महाराज समाधी महोत्सवाची जय्यत तयारी

**• १७ जुलैपासून ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात**

परळी वै. । प्रतिनिधी

येथील श्री संत सावता महाराज मंदिरात प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी १७ ते २४ जुलै दरम्यान श्री संत श्रेष्ठ शिरोमण सावता महाराज समाधी महोत्सव व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ खंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले



असून या सात दिवस चालणाऱ्या सप्ताहात महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार गायक व मृदंग वादक तसेच भारूड असे विविध धार्मिक कार्यक्रमा सोबतच कलावंत आपली कला भारुडाच्या माध्यमातून सादर करणार असून या निमित्त रक्तदान तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार आधी सामाजिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या ▶▶ उर्वरित पान २ वर




# शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या हस्ते हॉटेल विराज चे उद्‌घाटन संपन्न




वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे मोरेवाडी येथे युवासेना वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथजी मोरे,युवानेते राजेश नाना मोरे व युवानेते लक्ष्मण (जिजा) मोरे, यांच्या हॉटेल विराज चे भव्य उद्घाटन शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी सरांनी त्यांचे अभिनंदन करत सर्व मोरे परिवारास शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिवसेनेचे वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, ज्येष्ठ नेते वचिष्ठ आण्णा मोरे,शिवसेनेचे जिल्हा सहसचिव युवराज मामा शिंदे, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख वचिष्ठ नाना शेंडगे,शहर प्रमुख शिवाजीराव दुटाळ, राजेश नाना मोरे,बाबासाहेबजी राऊत, केसापुरीचे माजी सरपंच जगन्नाथजी कवचट,मैंदा पोखरीचे माजी सरपंच चंद्रकांतजी करांडे, डॉक्टर अवारे साहेब,डॉक्टर आंधळे साहेब, उद्योजक सुंदरजी शेवाळे, महादेव दाजी बोंद्रे, सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेर चे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर सातपुते सर,युवानेते अश्विनजी लांडे,जिजाभाऊ चिंचकर,राजेंद्र सातपुते, शंकर वीर, सुरेश खडुळ,ज्ञानेश्वर बोंद्रे,अविनाश बोंद्रे,चंद्रकांतजी करांडे,तुकाराम गायकवाड सह सर्व उपस्थित होते!!

## राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य आनेराव यांनी केलं उपस्थित राहण्याचे आव्हान

## बीडमध्ये धनंजय मुंडे यांच्या वाढदिवस निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते व राज्याचेमाजी मंत्री मा. धनंजय मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यालय,मित्र नगर चौक येथे पार पडणार आहे, या शिबिराचे आयोजन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष इंजि. अजिंक्य आनेराव यांनी केले आहे उद्या सकाळी १० वाजल्यापासून दुपारी २ वाजेपर्यंत हे रक्तदान सुरू राहणार आहे या शिबिरात अनेक कार्यकर्ते, तरुण वर्ग आणि नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन अजिंक्य आनेराव यांनी केलं आहे या रक्तदान उपक्रमामागील उद्देश म्हणजे समाजात रक्तदानाबाबत जनजागृती करणे आणि गरजू रुग्णांसाठी आवश्यक रक्तसाठा उपलब्ध करून देणे हा असतो इंजी. अजिंक्य आनेराव यांनी यावेळी प्रसिद्ध पत्रकात




म्हटल आहे आमचे नेते धनंजय मुंडे साहेब हे नेहमीच सामाजिक कार्यात पुढाकार घेत असतात. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन आम्ही हा उपक्रम त्याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नेहमी राबवत असतोत म्हणून उद्या रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, स्थानिक पदाधिकारी आणि युवकां मित्र परिवारानी उपस्थित रहावे अस आव्हान राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाअध्यक्ष श्री अजिंक्य आनेराव यांनी केलं आहे.